# कोल्हापूरी बंधाऱ्याच्या लोखंडी प्लेटा चोरणारी टोळी हिंगणघाट पोलीसांच्या जाळ्यात आरोपी कडून ८,६९,०००/- रू. चा मुद्देमाल जप्त

दिनांक १३-०४-२०२२ रोजी सायंकाळी ०७.०० ते ८.१५ दरम्यान नांदगांव चौक, हिंगणघाट येथे नाकेबंदी करीत असतांना आरोपी नामे १) मनोज देवीदासजी मंगाम, वय २३ वर्ष, रा. आमगांव (खडकी), पो.स्टे. सिंदी (रेल्वे), २) सरफराज हबीब शेख, वय २३ वर्ष, रा. क्रांती चौक, वार्ड, नं. ४ बुट्टीबोरी, जि. नागपूर, ३) अय्युब वहीद खान, वय २१ वर्ष, रा. क्रांती चौक, वार्ड, नं. ४ बुट्टीबोरी, जि. नागपूर यांना चेक केले असता, त्यांचे ताब्यात एक विना नंबरचा नविन महेन्द्रा कंपनीचा बोलेरो पिकअपमध्ये २३ नग कोल्हापूरी बंधाऱ्याच्या लोखंडी प्लेटा प्रती प्लेट ३०००/- रू. प्रमाणे ६९,०००/- रू. भरून असल्याचे आढळून आले. त्यांना बंधाऱ्याच्या प्लेटाबाबत विचारपुस केली असता, त्यांनी उडवा उडवीचे उत्तरे दिली व प्लेटाबाबत कोणतेही कागदपत्रे नसल्याचे सांगितले. म्हणून सदरच्या बंधाऱ्याच्या लोखंडी प्लेटा या त्यांनी कुठल्या तरी कोल्हापूरी बंधाऱ्यावरून चोरून आणल्याचे आढळून आल्याने त्याचे विरूध्द पो.स्टे. हिंगणघाट येथे इस्तेगासा क्र. ०१/२०२२ कलम ४१ (१) (ड) फौ.प्र.सं. अन्वये नोंद करून त्याचे ताब्यातुन बोलेरो पिकअप व २३ नग बंधाऱ्याच्या लोखंडी प्लेटा असा एकुण ८,६९,०००/- रू. चा माल जप्त केला.

सदर जप्त कोल्हापूरी बंधाऱ्याच्या प्लेटाबाबत त्यांना अधिक विचारपुस केली असता, त्यांनी मौजा सिंदीविहीरी, पोलीस स्टेशन कारंजा येथील शासकिय कोल्हापूरी बंधाऱ्याच्या चोरल्याचे तपासात निष्पन्न झाल्याने व पो. स्टे. कारंजा येथे अप. क्र. १०३/२०२२ कलम ३७९ भा.दं.वि. नोंद असल्याचे दिसुन आले असुन पुढील तपास सुरू आहे.

सदरची कामगीरी मा. पोलीस अधीक्षक श्री. प्रशांत होळकर, मा. अपर पोलीस अधीक्षक श्री यशवंत सोळंके, मा. उपविभागीय पोलीस अधिकारी, हिंगणघाट श्री. दिनेश कदम, पोलीस निरीक्षक श्री संपत चव्हाण, पोलीस स्टेशन, हिंगणघाट यांचे मार्गदर्शनात गुन्हे प्रकटीकरण पथकाचे पोलीस अंमलदार शेखर डोंगरे, निलेश तेलरांधे, सचिन घेवंदे, विशाल बंगाले, सचिन भारशंकर  यांनी केली आहे.